काव्यनिर्मितीच्या मुळाशी जोडून अनेकविध आशयाचे चित्रण कवितेतून अभिव्यक्त केलेले आहे. १९६० पासून अशी जाणीवपूर्वकता दृगोचर होऊ लागली. १९६० नंतर मराठी वाङमयात सर्वच साहित्यप्रकारात नव्या जाणिवांचा शिरकाव होऊ लागलेला दिसतो. ग्रामीण साहित्याची धारा वास्तववादाचा आग्रह धरणाऱ्या जीवनवादी जाणिवांनी अधिक ठळकपणे दृगोचर होऊ लागली. तिला आपल्या कार्याचे स्पष्ट भान आले. यातूनच ही जाणीवपुर्वकता फलद्रूप झाली.[५] विठ्ठल वाघांची कविता ही स्पष्ट भावातून निर्माण झालेली आहे. त्यातील अनुभव, जाणिवा, सत्य, वास्तवातील अनुभवाला जोडून आलेल्या आहेत. म्हणून साय, वैदर्भी काया मातीत मातीत, पंढरीच्या वाटेवर, कपाशीची चंद्रफुले, पाऊसपाणी आणि गावशिव या एकूण कवितासंग्रहांचा अभ्यास करताना जाणवते की, साठोत्तर काळातील बदलते ग्रामीण जीवन आणि लोकमानस यांचा वेध ही कविता घेते. जितक्या सहजतेने ती लोकपंरपरा आणि लोकसंस्कृतीचे संदर्भ टिपत असते, तितक्याच गांभीर्याने वर्तमानातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येसारख्या प्रश्नांनी ग्रासलेल्या अनुभवविश्वाचे, धगधगत्या वास्तवाचेही दर्शन ती घडवीत असते. विठ्ठल वाघ यांची कविता ग्रामीण अनुभवविश्व आणि स्वतंत्र अभिव्यक्ती घेऊन अवतरली आहे. विठ्ठल वाघ यांच्या कवितेत ग्रामीण बोलीचा बाज अभिव्यक्त जीवनानुभवाला अस्सलतेचे परिणाम प्राप्त देणारा ठरला.[६]

विठ्ठल वाघांच्या जीवनानुभवाला अभिव्यक्त करण्यासाठी वऱ्हाडच्या ग्रामीण बोलीभाषेचा उपयोग हा कवितेतील आशयाला अधिक समर्पक करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. म्हणून वाघांची कविता विविध आशयसूत्रबध्दतेतून एक स्वतंत्र रुप धारण करुन निर्माण झालेली आहे. उत्कट मनोवृत्ती, भावावस्था, चिंतनशीलता अशा गुणधर्मामुळे कवितेत एक प्रकारचा ऐतिहासिक कालक्रमाच्या शृंखलेतून बाहेर पडलेला वर्तमान प्रतीत होतो.[७] उत्कट मनोवृत्ती, चिंतनशीलता व भावावस्थेसारख्या गुणधर्मामुळे वाघांच्या कवितेतला अकृत्रिम आशय असून विविध स्वरुपाच्या विषयांना घेऊन अभिव्यक्त झालेला आहे.

**संदर्भ -**


१) नाफडे शोभा - स्वातंत्र्योत्तर वऱ्हाडी साहित्य,स्वरुप प्रकाशन, औरंगाबाद पृ.१८२

२) मेदककर प्रकाश - कविता (वाङ्मयप्रकार), य.च.मु. विद्यापीठ, नाशिक, पृ.१३.

३) ठग भगवान - दै.देशोन्नती, दि.०१ ऑगस्ट २००४.

४) मुलाटे वासुदेव - साहित्य समाज आणि परिवर्तन, पृ.४८.

५) ठाकूर रवीन्द्र - प्रवाह आणि प्रतिक्रिया, पृ.९२.

६) तत्रैव, पृ.९४.

७) मेदककर प्रकाश - कविता (वाङ्मयप्रकार), य.च.मु.विद्यापीठ, नाशीक पृ.१५.


**17**

# वृत्तपत्रांच्या भूमिका आणि सामाजिक सलोखा एक दृष्टीक्षेप


**सर्जेराव नारायण बोराडे**
पीएचडी स्कॉलर, सोसिओलॉजी डिपारमेंट,
युनिव्हर्सिटी ऑफ मुंबई


**********

**प्रस्तावना:**

भारत हे एक लोकशाही राष्ट्र आहे त्यामुळे देशातील प्रत्येक नागरिकांना समान हक्क आणि कर्तव्यांची अपेक्षा असते. प्रसार माध्यमांना लोकशाही मध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडावी लागत असते. भारतीय संविधानाचे विशारद डॉ. बाबासाहेब आंबेडकर (१९४९) यांनी असे म्हटले होते की, लोकशाही रुपी इमारतीचा प्रसार माध्यमे एक महत्त्वाचा खांब आहे. तसेच दक्षिण अफ्रिकेचे प्रथम राष्ट्राध्यक्ष नेल्सन मंडेला १४, फेब्रुवारी १९९४ यांनी असे म्हटले होते की, मानवी शरीरातील रक्त जेवढे महत्वाचे आहे, तेवढेच लोकशाहीमध्ये प्रसार माध्यमे महत्वाची असतात. भारतात आधुनिक लोकशाहीला सक्षम आणि मजबूत करण्यासाठी प्रसार माध्यमांना एक महत्त्वाचे मापदंड मानले जाते. सार्वजनिक क्षेत्राला आकार देण्यामध्ये प्रसार माध्यमांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. कारण विविध माध्यमांच्यात एकटय वृत्तपत्राच्या योगदानामुळे जगाच्या इतिहासाला वेगळीच कलाटणी मिळाली आहे. आधुनिक जगातील महत्त्वाच्या बहुतांश क्रांत्या सफल होण्यात वृत्तपत्रांचा वाटा महत्त्वाचा आहे. पण कालांतराने प्रसारमाध्यमांच्या कारभारामध्ये प्रभावी बदल होत गेले आहेत. वाढता राजकीय हस्तक्षेप आणि भांडवलीशक्तींचे प्रसारमाध्यमांच्या क्षेत्रात प्रभाव वाढत आहे. याचा परिणाम प्रसारमाध्यमांच्या संपादक व पत्रकारिता क्षेत्रातील त्यांच्या एकंदरीत भूमिकेवर उमटू लागला आहते. प्रसारमाध्यमे राजकीय आणि भांडवली हस्तक्षेपामुळे आपली मूळ



Scanned by CamScanner

सामाजिक जबाबदारी बाजूला सारून अभिप्राय उत्पादन करणारी साधने बनली आहेत. असे नोम चोम्स्की (१९८८) या अमेरिकन विचारवंताचे मते आहे. या प्रक्रियेलाच त्यांनी 'मॅन्यूफॅक्चरिंग कन्सेंट' असे नाव दिले आहे. विशिष्ट राजकीय आणि भांडवलदारी विचार लोकांना पटवून देण्याची भूमिका वृत्तपत्र बजवत आहते. भारतात प्रसारमाध्यमांचा विकास एका विशिष्ट परिस्थितीमध्ये झाला आहे. १९ व्या शतकात ब्रिटिश साम्राज्यच्या छत्रछायेत भारतीय वृत्तपत्रांचे प्रस्थ दिवसेंदिवस वाढत गेले होते. देशातील जातीय व्यावस्थमुळे व एकूणच सामाजिक रचनेमुळे भारतीय वृत्तपत्रांवर अगदी पहिल्यापासूनच ब्राह्मणवादी विचारांचे जातीय प्रखर संस्कारांचा प्रभाव होता. त्यामुळेच प्रखर राष्ट्रवादी समजल्या जाणाऱ्या कित्येक वृत्तपत्रांनी जातीच्या वर्चस्ववादी पुर्वाग्रहांचे उघडपणे समर्थन केले होते. महाराष्ट्रामध्ये लोकमान्य टिळकांचा केसरी असो किंवा विष्णू शास्त्री चिपळूणकरांचा निबंधमाला. या १९ व्या शतकात उगम पावलेल्या मराठी वृत्तपत्रांनी नेहमीच उच्चजातिय वर्चस्ववादाला महत्त्वाचे स्थान दिले होते. म्हणूनच चिपळूणकरांसारख्यांनी महात्मा फुल्यांच्या समर्पक क्रांतीकारी दृष्टीला नजरेआड करण्यासाठी त्यांच्या व्याकरणातल्या चुकाच सर्वात अगोदर पाहिल्या, अर्थात या विविध वृत्तपत्रांच्या मध्ये अनेक वृत्तपत्रे अपवादही होती. ज्यांनी आपले प्रामाणिक सामाजिक भूमिका बजवली होती. समाजातील प्रत्येक घटकांना माध्यमात प्रतिनिधित्व मिळायला हवं, अन्यथा एकतर्फी आणि असंतुलित माहितीचाच प्रसार होत राहील. 'पण ज्या समाजाला वर्षानुवर्षे प्रतिनिधित्वा पासून वंचित ठेवण्यात आले होते, त्या समाजाने स्वत:चेच माध्यम तयार करावे, ज्यामुळे त्या समाजाच्या समस्या व दु:ख सर्वांसमोर मांडता येईल,' असे डॉ.आंबेडकरांचे मत होते. म्हणून मूक्या समाजाच्या व्यथा व विद्रोह प्रकट करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी स्वत: १९२० साली पत्रकारितेकडे वळले होते.

पण मुख्य प्रवाहातील बहुतांश वश्तपत्रांनी जाती अंत आणि बहुजन समाजातल्या चळवळींना वेगळया दृष्टीने पाहिले होते. आज देखील तीच परंपरा दिमाखात चालू आहे. याच दृष्टीकोणातुन आजच्या परिस्थितीकडे पाहिले तर आज ज्या पद्धतीने दलित चळवळीला सातत्याने माओवादी व देशद्रोही ठरवून चळवळीला रद्दबातल करण्यात येत आहे. ह्यावरून हेच सिद्ध होते की, जातीवादी पूर्वग्रह लादण्याची परंपरा आज पण चालू आहे. भारतीय प्रसारमाध्यमांची दलित आणि जातीअंत चळवळींबाबतची भूमिका सुरुवातीपासूनच विकृत राहिलेली आहे. प्रसारमाध्यमांच्या भूमिकांचा इतिहास पडताळून पाहिला तर त्यात असणारी उच्चजातीय पूर्वग्रहदूषित दृष्टी स्पष्टपणे दिसत आहे.

**संदर्भ साहित्यांचा आढावा**: जॉन बोर्डीलॉर्ड, (१९८१), सिमुलेशन थेरी या सिद्धांतात समकालीन समाजाचे विश्लेषण आधुनिक दृष्टिकोनातून केलेले आहे त्यांच्यामते हा समाज उत्पादन पद्धती आणि उत्पादन संबंधाचे प्रभावित नाही तर आधुनिक माहिती तंत्रज्ञान आणि सूचना प्रसारण तसेच ज्ञानासंबंधी उद्योगांमुळे प्रभावित आहेत. पारंपारिक भांडवलशाहीत कामगारांचे विश्लेषण करून जास्तीत जास्त नफा कमवणे हा उद्देश होता. पण आज समाजातील प्रतिष्ठांनचा ,उद्देश संकेतांचे प्रभुत्व निर्माण करून नवीन संकेत निर्माण करणे हा आहे. यामुळे संकेत आणि वास्तवता यांचा फरक करणे खूप कठीण होत आहे. म्हणजेच कोणते विचार किंवा वस्तू वास्तविक किंवा सत्य आहे आणि कोणत्या वस्तू किंवा विचार संकेत आहेत हे कळणे कठीण झालेले आहे. अशा स्वरूपात भारतीय प्रसारमाध्यमात ही कोणता दृष्टिकोन आहे हे समजणे कठीण केलेले आहे. ग्लेंडा डॅनियल, (२०१०), यांनी द रोल ऑफ मिडीया इन डेमोक्रॅटिक: अनरिवेलिंग द पॉलिटिक बिटवीन द मेडिया, द स्टेट अँड द एएनसी इन द साऊथ आफ्रिका या संशोधन निबंधात दक्षिण आफ्रिकेतील राजकारण आणि प्रसार माध्यमात संबंधीचे विषयाचा आढावा घेतलेला आहे. प्रसारमाध्यमांना स्वातंत्र्य आणि लोकशाही मधील संबंधाचे महत्व यामधून संशोधन करताना अनुभविक विचार, मुलाखत, वृत्तपत्रातील कथा, वृत्तपत्रातील सार्वजनिक पत्रे, नोंदणीकृत सभा, पॅनल चर्चा, विरोधकांच्या क्रिया-प्रतिक्रिया, एएनसीची चर्चा मालिका आणि माध्यमात प्रसारित झालेले इतर दस्तावेज यांचा उपयोग करून अभ्यास केला आहे. संपूर्ण लोकशाही सिद्धांत बरोबरच मनोविश्लेषणात्मक सिद्धांत



Scanned by CamScanner

आणि उत्तर अधूनिकता दृष्टिकोनाचा संमिश्र उपयोग केलेला आहे. दक्षिण आफ्रिकेच्या लोकशाही शासन व्यवस्थेला मजबूत करण्यात छापील माध्यमांची भूमिका अतिशय महत्त्वाची राहिलेली आहे. कारण ते नेहमी खुल्या आणि विभाजित चर्चेला तयार असतात. दक्षिण आफ्रिकेमध्ये प्रसारमाध्यमांमध्ये लोकप्रियतेच्या दृष्टिकोनातून विविध विचारधारा प्रवेश करत आहेत. या माध्यमांमध्ये विरोधी घटकात प्रवश होत आहे. ज्यामध्ये **उंबटू** चा अभाव होत आहे. अशा सिद्धांत विश्लेषण करताना दक्षिण आफ्रिकेतील माध्यमे आणि सत्ताधारी यांच्यामधले मतभेद आणि दक्षिण आफ्रिकेमध्ये श्वेतवर्णीय लोकांचा प्रसारमाध्यमांवर कब्जा आहे. यामुळे कृष्णवर्णीय पत्रकारांना आपल्या विचारांचा आणि कौशल्यांचा परिपूर्ण वापर करता येत नाही. कारण श्वेतवर्णीय माध्यमे आणि त्यांचे मालक श्वेतवर्णीय भांडवलदार आणि सत्ताधार्यांचे मिळालेले आहेत. यामुळे माध्यमांच्या क्षेत्रामध्येही वर्णभेदाची स्थिती पहावयास मिळते आहे. पाटील स्मिता, (२०११), यांनी व्हॅयलेन्स ऑफ सायलेन्स: ब्राह्मणीकल मीडिया कंट्रक्शन ऑफ कास्ट अँड जेंडर या शीर्षकाखाली लेख लिहून भारतीय प्रसारमाध्यमांमध्ये ब्राह्मणी विचारांची प्रसारमाध्यमे जातीवादी आणि लिंगभेद विचारांचा अधिक प्रभाव निर्माण करताना दिसतात. भारतीय समाजव्यवस्थेच्या विकासाच्या संवेदनक्षम प्रक्रियेला छेद देऊन प्रसार माध्यमे एका वेगळ्याच विचाराकडे मार्गक्रमण का करत आहेत? या संशोधन लेखात निरीक्षण, विश्लेषण आणि वर्णन पद्धतीचा उपयोग केला होता. तसेच जाती संबंधीचे सिद्धांत, स्त्री–पुरुष समतावादी सिद्धांत आणि विवेचनात्मक स्त्रीवादी सिद्धांतांचा उपयोग केला होता. महाराष्ट्रातील भंडारा जिल्ह्यातील खैरलांजी येथील एका दलित कुटुंबातील चौघांची हत्याच्या घटनेवर सदर लेखात चर्चा केलेली आहे. आज माध्यमे अशा घटनांकडे जास्त लक्ष देत नाहीत. अत्याचारित दलित प्रतिमा मलिन होईल असेच जाणीवपूर्वक चित्र निर्माण करण्याचा प्रयत्न माध्यमांकडून होत आहे. जातीय अत्याचाराला माध्यमे आपल्या ब्राह्मणीविचार कौशल्याने बातमी स्वरूपात परिवर्तन करत आहेत. माध्यमातून ब्राह्मणवादी विचारशक्ती दाखवण्याचा प्रयत्न केला जात आहे. जातीय अत्याचाराच्या बातमीला विक्री स्वरूपातून निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. जातीवादी विचार हे जुन्या ब्राह्मणी विचारवादाची देणगी अशा ब्राह्मणी विचारांची मुळे भारतीय समाजात खोलवर रुजलेले आहेत का? आणि याचा परिणाम प्रसार माध्यमाच्या क्षेत्रात कसा होतो? हे पाहणे गरजेचे आहे. गोपाळ गुरू, २०१२, राईज ऑफ दलित मिलीओनर ऑल पेन्शनसिटी स्पेकटीकॉल या लेखामध्ये गुरू यांनी २१व्या शतकातील भांडवलवाद आणि नव उदारवाद या दोन्हीतील फरकाचे चर्चा केलेली आहे तसेच मूलभूत विचार समान असतात पण आज काही ही दलित उद्योजक म्हणून उदयाला येत आहेत ही आनंदाची स्वागतार्ह बाब आहे. पण पारंपारिक उद्योजक घराण्यांनी ही दलित उद्योजकांना मान्यता दिलेली आहे. पुण्यात दलित उद्योजकांनी एक मेळावा घेतला यात विशेषता चार छापील मीडिया आणि पाच प्रक्षेपित मीडियाचे प्रतिनिधी, काही प्रादेशिक आणि राष्ट्रीय दूरदर्शन वाहण्याचे लोकही हजर होते यामुळे दलित लक्षादेशांची प्रतिमा प्रसिद्धीने काही प्रमाणात जाळली होती. भारतीय उद्योग वर्गाच्या विचाराची कमतरता प्रकर्षाने जाणवते एखाद्याची पात्रता त्यांच्या जात, वंश, भाषा किंवा कुटुंबावर आधारित ठरवणे चुकीचे असते. म्हणून दलित उद्योजकांना आपली प्रसिद्धी स्वत: होऊन जाहीर करावे लागले की आम्ही ही उद्योग क्षेत्रांमध्ये आहोत. परंतु प्रसार माध्यमाने त्यांच्या नावापुढे दलित हा लेबल लावून परंपरेची जाणीव करून दिलेली होते. या लेखामध्ये डॉ. आंबेडकर यांच्या लोकशाहीवादी, मानवतावादी दृष्टिकोनातून सामाजिक समता आणि बंधुता आणि न्यायाच्या विचाराने लोकशाहीतील वृत्तपत्रांच्या भूमिकांचा चिकित्सक अभ्यास केलेला आहे. आजही माध्यमांना एखाद्याच्या कर्तुत्व यापेक्षा त्याची पारंपारिक जात महत्त्वाची वाटते हे लोकशाही देशात खेदजनक आहे. अभ्यासाचे उद्देश आधुनिक काळात प्रसार माध्यमाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे. म्हणून अशा प्रसार माध्यमातील वश्त्तपत्रांची सामाजिक जबाबदारी खूप महत्त्वाची आहे. सामाजिक जागश्ती बरोबरच सामाजिक विषमता दूर करणे आणि अन्याय अत्याचाराला वाचा फोडणे, सामाजिक अन्याय



Scanned by CamScanner

अत्याचाराची माहिती समाज व सरकार दरबारी मांडणे, वृत्तपत्रांच्या पूर्वग्रहदूषित विचाराचा सामाजिक ऐक्य भावावर होणारा परिणाम अभ्यास करणे, समाजातील ब्राह्मणी धर्मांधवादी जातीवादी वर्गवादी आणि भांडवलवादी पुरुष प्रधान प्रभावामुळे आजची वृत्तपत्रे मूळे भूमिकेपासून भटकली आहेत का? याचा शोध घेणे. अशा काही महत्त्वाच्या उद्देशासह देशामध्ये सामाजिक एकतेला पोषक वातावरण निर्माण करण्याच्या उद्देशाने हा शोध निबंध मांडला आहे. सुरेश कुमार, २०१४, यांनी व्हायलेशन वरणीकुलत ब्लॉग अँड इट्स युज एज अण अल्टरनेटिव्ह मिडीया दलित क्रिटिकल डिस्कोर्स अनालिसेस हा शोध निबंध लिहिताना भारत देशातील विविध प्रसारमाध्यमांना पर्याय म्हणून दलितांकडून ब्लॉगचा वापर केला जात आहे. वैश्विक मानवी हक्काच्या घोषणापत्रानुसार प्रत्येक मानवाला काही जन्मजात समान अधिकार, प्रतिष्ठा आणि स्वातंत्र्य बहाल केली आहेत. संशोधनात व्यापक गुणात्मक विश्लेषण आणि व्याख्यान पद्धतीचा उपयोग केला आहे. तसेच कट्टरपंथीय प्रसारमाध्यमांच्या सिद्धांत उपयोगात आणले आहे. संशोधनाचे अभ्यास क्षेत्र भारतीय जाती व्यवस्था आणि प्रसारमाध्यमे हा आहे. प्रसारमाध्यमे एक प्रबळ सत्ता मूल्य रूपातील होत आहेत. त्यामुळे सामाजिक परिवर्तनाची प्रभावित सत्ता माध्यमे निर्माण होऊ लागलेली आहेत. प्रसारमाध्यमे व्यक्तीच्या वर्तन आणि सवयी परिवर्तनाची प्रमुख साधन होऊ लागलेली आहेत. आज असे दिसते की प्रसारमाध्यमे निशब्द प्रेक्षकांची झालेली आहेत. प्रस्थापित प्रसारमाध्यमे समाजात उपेक्षित घटकांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष करताना दिसतात. उपेक्षितांना पर्यायी माध्यमांचा वापर करण्याची गरज भासू लागलेली आहे. बबन कांबळे २०१९ जातीचे कटुसत्य सदर संपादकीय लेखांमध्ये कांबळे यांनी भारतीय राजकारणात राजकीय पुढारी जातीचा वापर कसा सोयीनुसार करतात यावर भर दिला होता. भारतीय राजकारणाची जाती संदर्भातून चर्चा केलेली आहे. या चर्चेसाठी विवेक रचनात्मक व समीक्षणात्मक दृष्टिकोनाचा वापर केला आहे. मुक्त निरीक्षणाचा आधार घेऊन ही मांडणी केली आहे. यासंदर्भात केंद्रीय कॅबिनेट मंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नितीन गडकरी यांनी एक विधान केले होते की जातीचे नाव जर कोणी काढत असेल तर त्याला ठोकून काढीन यामुळे भाजपाचे नेते किती धर्मनिरपेक्ष आहेत. गडकरींच्या या विधानाचे प्रसार माध्यमातून सर्वत्र स्वागत केले जात होते. पण वस्तुस्थिती मात्र वेगळीच होती. कारण अशी विधाने निवडणूक काळात करून जात संपली आहे किंवा आम्ही जातिवाद मानत नाही हे दाखवण्याचा हा शुद्ध प्रयत्न असतो. कारण गडकरी साहेबांनी केवळ हे विधान केले आहे कृती मात्र शून्य आहे. कारण ते ज्या पक्षाचे नेतश्त्व करतात त्या पक्षाची विचारधारा मुळातच ब्राह्मणी परंपरेच्या जातीवादी विचारावर आधारलेली आहे. यामुळे भाजपचे नेतश्त्व सर्वात जातीवादी विचार व कृतीचा वापर करताना अनेक वेळा दिसून आलेले आहे. त्यांना जर ठोकायचे असेल तर त्यांनी अगोदर आपल्या पक्षातील नेत्यांना ठोकला पाहिजे. त्यांच्याकडून माणसांबरोबरच देवांचीही जातीवार वाटणी केली जात आहे. म्हणून त्यांनी फक्त म्हटले आहे की जात संपलीत नाही. आज राजकारणामध्ये अनेक निर्णय जातीचा विचार करूनच घेतले जात असतात. ही वस्तुस्थिती देशामध्ये पाहावयास मिळते. प्रसारमाध्यमांना अशा बाबतीमध्ये चर्चा करण्यास वेळ नाही परंतु प्रपोगंडा निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातून ते पुढे असतात.

**वृत्तपत्रांच्या सामाजिक विषमभावाचा आढावा:**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सक्षम नेतृत्वाखाली १९२७ साली महाडच्या सत्याग्रहाने आक्रमक दलित चळवळीची सुरु झाली होती. काही वर्षांच्या अंतराने,१९३०–३१ पहिली गोलमेज परिषद संपन्न झाली होती. याच काळात दलित चळवळीला आणि जाती–अंताच्या विचारधारेला नकरात्मक दृष्टीकोनातून पाहण्यास मोठ्या प्रमाणात सुरुवात होती. ह्या काळातील मुख्य प्रवाहातील अनेक मराठी व इंग्रजी वृत्तपत्रांकडे पाहिले तरी त्यांच्या जातीवादी वृतीचा आपल्याला सहजपणे अंदाज घेता येईल. पुण्यातील काही वृत्तपत्रांनी महाडच्या सत्याग्रहाचा विरोध करण्यासाठी अस्पृश्यतेचे आणि हिंदुत्वाचे जोरदार समर्थन केले होते. 'केसरी' सारख्या प्रखर राष्ट्रवादी मानलेल्या वृत्तपत्राने आंबेडकरी चळवळीवर समाजविघातक व हिंसक असल्याचे अनेक दोषारोप



Scanned by CamScanner

केले होते. त्याचबरोबर डॉ. आंबेडकरांचे काँग्रेसबरोबर जेव्हा वाद वाढत गेले तेव्हा अनेक राष्ट्रवादी वृत्तपत्रांनी आंबेडकरांना व तत्कालीन दलित चळवळीला देशद्रोही ठरवण्याचा सपाटा लावला होते. स्वत:ला पुरोगामी असल्याचा आव आणणारी वृत्तपत्रेदेखील सामील होती. 'मुंबई काँग्रेस'चे मुखपत्र समजले जाणारे 'बॉम्बे क्रोनिकल' हे १९२० ते ३० च्या दरम्यान असले आरोप करण्यामध्ये सर्वात पुढे होते. म्हणजेच देशद्रोहाचे आणि हिंसेचे आरोप दलित चळवळीसाठी काही नवे नाहीत. जेव्हा केव्हा दलित चळवळीने आक्रमकपणे स्वत:ला उभे केले तेव्हा तत्कालीन प्रसारमाध्यमांनी, विशेषत: वश्त्तपत्रांनी ह्या चळवळींना अशक्त करण्यासाठी त्यांच्यावर खोट्यनाट्य आरोपांचा वर्षाव केला जात होत. दलित चळवळींना सतत खोट्यानाट्या आरोपांत हेतूपुरस्सर गुंतवून ठेवले जात होते.

डॉ.आंबेडकरांच्या मते, 'समाजातील प्रत्येक घटकांना भाध्यमात प्रतिनिधित्व मिळायला हवं, अन्यथा एकतर्फी आणि असंतुलित माहितीचाच प्रसार होत राहील.' पण ज्या समाजाला वर्षानुवर्षे प्रतिनिधित्वा पासून वंचित ठेवण्यात आले होते, त्या समाजाने स्वत:चेच माध्यम तयार करावेत, ज्यामुळे त्या समाजाच्या समस्या व दु:ख सर्वांसमोर मांडता येईल, म्हणून मूक्या समाजाच्या व्यथा व विद्रोह प्रकट करण्यासाठी डॉ. आंबेडकर स्वत: १९२० साली पत्रकारितेकडे वळले होते. डॉ.आंबेडकरांने ३१ जानेवारी १९२० रोजी मूकनायक हे पाक्षिक सुरु केले होते. मूकनायक म्हणजे 'मुक्या समाजाचा नायक'. वर्षानुवर्षे ज्या समाजावर अन्याय होत राहिलेला आहे, त्या समाजाला त्याविरुद्ध लढा देऊन न्याय मिळवुन देण्यासाठी उपाययोजना सांगणारे एक माध्यम म्हणजे मूकनायक होय. या वश्त्तपत्राच्या माध्यमातून डॉ. आंबेडकरांनी लढा निर्माण केला होता.

.चोम्स्कीच्या मताप्रमाणे दलित चळवळींबाबत पूर्वग्रहदुषित व नकारात्मक अभिप्राय घडवण्यात मुख्य प्रवाहातील वृत्तपत्रांनी सतत कामकरत आहते. स्वत: आंबेडकरांना अनेकवेळा 'देशद्रोही' म्हणून हिणवण्यात आले होते. बहुतेक वेळा त्यांना अनुल्लेखान अपमान करण्याचा प्रयत्न झाला होता. तरीपण त्यांचे कर्तृत्व इतके मोठे होते की ते यातून यशस्वीरित्या बाहेर येऊ शकले होते. त्याच प्रमाणे गेले अनेक दशके आंबेडकरी चळवळीवर सातत्याने सांप्रदायकता आणि जातीवादाचे आरोप झाले आहेत.

दलित पँथरच्या उभारणीच्या काळात १९७० च्या दशकात मुख्य प्रवाहातील वृत्तपत्रांच्या भूमिका पुन्हा एकदा स्पष्टपणे दिसले होते. याच काळात राज्यभर दलितविरोधी अत्याचाराने आपला उच्चांक गाठला होता. हिंसक मनोवृत्तीचा तो यथार्थ अविष्कार होता. तरीपण बहुतेक तत्कालीन मराठी वृत्तपत्रांनी या अत्याचारांची आपल्या वृत्तपत्रांतून साधी दखलसुद्धा घेतली नव्हती. केवळ काही हाताच्या बोटावर मोजण्याइतकी वृत्तपत्रे आणि नियतकालिके सोडली तर बहुतेकांनी अत्याचाराला बदनाम ऊल्लेखानेच दाबण्याचा प्रयत्न केला होता. नामांतराचे आंदोलन असो किंवा तत्कालीन महाराष्ट्रातील दलित अत्याचाराची अनेक प्रकरणे, ह्या सर्व बातम्यांना म्हणावी तितकी जागा प्रसार माध्यमांमध्ये कधीच मिळाली नाही. जेव्हा केव्हा ती मिळाली तेव्हा अपवाद वगळता तिथे पूर्वग्रहांचे दर्शन पहाण्यास मिळाली आहे. आजदेखील तीच परिस्थिती आहे. २०११च्या मानवी हक्क संस्थेच्या अहवालानुसार प्रत्येक दिवसाला तीन दलितांच्या हत्या होतात, चार दलितांची घरे जाळली जातात आणि तीन दलित स्त्रियांवर बलात्कार केले जात आहेत. भारतीय समाजात जातीय अत्याचाराचे एवढे उग्र स्वरूप धारण केलेले आहे तरीही दलित विरोधी जातीय अत्याचारावर कधीही सखोलपणे वृत्तपत्रातून चर्चा झाल्याचे दिसून येत नाही. उलट दलितांनाच किंवा त्यांच्या चळवळींना माओवादी ठरवण्यात माध्यमे सर्व शक्ती पणाला लावताना दिसत आहेत. आजच्या काळात वृत्तवाहिन्यांच्या आगमनाने परिस्थिती सुधारण्याऐवजी अतिशय गंभीर होताना दिसत आहे. नव्या राजकीय शक्तीच्या अधिपत्याखाली प्रसार माध्यमांनी पूर्वपहार चालू असलेल्या पूर्वग्रह आणि दलित द्वेषभावनेला नवीन रूप दिले जात आहे. आज दलितांना अति डावे सारखे नवनवीन शब्दप्रयोग केले जात आहेत. जो कोणी सरकारी धोरणाच्या विरुद्ध बोलेन किंवा चिकित्सा करण्याचा प्रयत्न करेन त्यांना आज राष्ट्रद्रोही किंवा



Scanned by CamScanner

नक्षलवादी म्हणून बोलले जाते किंवा अर्बन नक्षली म्हणजेच शहरी नक्षली अशा शब्दांनी प्रसिद्धीच्या ब्रेकिंग बातम्या बनवण्याचे प्रयत्न माध्यमातून केले जात आहेत. आज देखील आंबेडकरी चळवळीला नकारात्मक दृष्टिकोनातून पाहिले जात आहे. दुसरीकडे मात्र माध्यमे सत्ताधारी, भांडवलदार आणि उच्च जाती आणि वर्गांची हुजरेगिरी करतात की काय असे वाटत आहे. आज माध्यमात स्पर्धा निर्माण झाली आहे ही माध्यमे व्यावसायिक स्वरूप धारण करत आहेत. काही माध्यमे भ्रष्टाचाराच्या मार्गाने पेड न्यूज च्या मागे धावताना दिसत आहेत. केवळ बोटावर मोजण्याइतकी माध्यमे किंवा पत्रकार आपली जबाबदारी पूर्ण करण्यासाठी धडपडत करत आहेत. पण त्यांना आर्थिक परिस्थितीला आणि सत्ताशक्तीच्या विरोधाचा सामना करावा लागत आहे. भारतीय लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून दिलेली जबाबदारी बरोबरच मानवतावाद पण आज माध्यमे विसरलेली आहेत की काय असे दिसून येत आहे.

**निष्कर्ष** : आज एकाबाजूला आंबेडकरी चळवळीच्या इतिहासाचे गुणगान गायले जाते आहे. तर दुसऱ्या बाजूला समकालीन दलित कार्यकर्त्यांना आणि नेत्यांना सातत्याने हिणवले जाते आहे. हे जातीयवर्चस्ववादाचे सोयीस्कर स्वरूप आहे. स्वतः आंबेडकरनी ह्याबाबत आपल्या 'मूकनायक' पत्रिकेत वेगळ्या संदर्भात ह्या सोयीस्करवादाचा उल्लेख करत कडाडून टीका देखील केली होती. गेल्या अनेक दशकांपासून ह्या प्रसार माध्यमांनी, प्रथम वृत्तपत्रांनी, नियतकालिकांनी आणि कालांतराने वृत्त—वाहिन्यांनी, छुप्या पद्धतीने जातीवादाला प्रवृत्त केले आहे. नैतिकतेचे वरवर अवडंबर माजवून उच्चजातीय सांस्कृतिक जातीवर्चस्व गाजवून माध्यमांनी व त्यांच्या म्होरक्यांनी शोषणाच्या परंपरेला आणि उच्चजातीय वर्चस्ववादाला कधीच म्हणावे तितके आव्हान दिले नाही. भारतातील दलित समाजाची स्थिती सुधारणा किंवा सिमांतिक मुक्तीची चर्चा ऐतिहासिक, राजकीय, आर्थिक व सामाजिक सिद्धान्तानुसार केली जात नाही. अन्याय—अत्याचार गरिबी तसेच सामाजिक, आर्थिक आसमानतेचे बळी समाज ठरत आहेत. यावर प्रसार माध्यमांनी विशेष लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. भारतातील २०कोटी १३ लाख म्हणजेच देशातील एकूण लोकसंख्येच्या १६.६३ टक्के लोक हजारो वर्षांपासून दुर्लक्षित म्हणजेच सिमांतिक आहेत (2011 India's Census). एससी, एसटी, ओबीसी व स्त्रियांपैकी दलित हा एक सर्वात सिमांतिक घटक एक आहे. देशाला स्वातंत्र्या मिळून जवळपास ७५ वर्ष पूर्ण होऊनही आजही समाजातील जातीवादी संपला नाही. देशात दलित समाजात सर्वात जास्त सिमांतिक, दुर्लक्षित, असुरक्षित व अन्याय अत्याचार पीडित आहेत. सामाजिक चळवळ आणि शासकीय ध्येयधोरणे यामुळे विकासाची संधी निर्माण होत आहे. पण सरकारच्या उच्चपदस्थ अधिकारी वर्ग, पोलिस अधिकारय्रांना अनुसूचित जाती—जमातीच्या अत्याचार प्रतिबंधक कायद्याची माहिती करण्यासाठी आणि तक्रार दाराकडून आवश्यक माहिती जाणून घेण्यासाठी तसेच इतर तरतुदी विशेष मोहीम करणे आवश्यक आहे. साधारणपणे असे निदर्शनास येते की राज्यातील काही गावात किंवा जिल्ह्यात अनुसूचित जाती व जमाती अत्याचाराची प्रकरणे सतत घडत आहेत. त्यांच्याकडे विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. पण पुरातन जातीवादी ब्राह्मणी विचारधारा नव्या रुपाने पुन्हा डोके वर काढत आहेत ती नवी शक्ती म्हणजेच आधुनिक प्रसार माध्यमे होय. भारतीय प्रसारमाध्यमांवर ब्राह्मणी विचारधारेचा पगडा आहे. म्हणून दलित अत्याचाराच्या घटना मानवतेच्या दृष्टिकोनातून न पाहता केवळ प्रसिद्धीच्या बातम्या म्हणून पाहिल्या जातात कारण आजच्या युगात माध्यमातून प्रसिद्ध झालेल्या घटकांना विशेष प्रभाव समाज आणि राज्य व्यवस्थेवर निर्माण होतो. परंतु ब्राह्मण्यावादी माध्यमे दलितांना पूर्वीप्रमाणे अस्पृश्य समजून वर्तन करतात अत्याचार होऊनही त्याकडे दुर्लक्ष केले जात आहेत.

आज काळ बदललाय! मारून मुटकून 'पॉलिटिकली करेक्ट' राहण्याचा जमाना आता उरला नाही. जो थोडा शिष्टाचार होता तो देखील उरला नाही. आज बहुतांश प्रसारमाध्यमे आपले जातीय आणि धर्मांध रूप स्पष्टपणे दाखवण्यास तीळमात्र कचरत नाहीत. भांडवली सामर्थ्य आणि विशिष्ट राजकीय शक्तींच्या अधिपत्याखाली ही माध्यमे, मुख्यतः वृत्तपत्रे आणि वृत्तवाहिन्या भारताचे राजकीय आणि सामाजिक व्याकरण बदलू पाहत आहेत. हे वास्तव फक्त पुरोगामी चळवळींसाठीच धोकादायक नाही तर ते भारतीय लोकशाहीसाठी आणि एकंदर विचार स्वातंत्र्याच्या पर्यावरणाला धोकादायक ठरू शकते. हे देशाच्या सार्वभौमतेला घातक होऊ शकेल या नवीन परिस्थितीला आविष्कृत करण्यात प्रसारमाध्यमांचे योगदान महत्त्वाचं ठरत आहे. आजच्या संदर्भात जो 'नवीन भारत' उभा



Scanned by CamScanner

होऊ पाहत आहे. त्यात प्रसारमाध्यमांची सक्रियपणे मदत घेतली जात आहे. त्या 'नवीन भारतात हिंसक प्रवृत्तीचा खुलेआमपणे पुरस्कार केला जात आहे. सांस्कृतिक विविधता, धार्मिक सलोखा आणि सामाजिक न्याय या मूलभूत सामाजिक तत्वांना तिलांजली दिली आहे. नव्या परिस्थितीत दलित चळवळ आणि जातीअंताच्या चळवळींना नव्या उमेदीने उभे राहण्यावाचून पर्याय नाही. यामुळे माध्यमांना दिलेल्या स्वातंत्र्याचा खरोखरच समाजातील बहुसंख्य आणि वंचित घटकांच्या कल्याणासाठी होणे गरजेचे आहे. म्हणून सर्वांनी देशहितासाठी एक सामंजस्य विचार करून देशातील माध्यमांनी आपल्या जबाबदारीचे भान ठेवून आपल्या कार्याच योगदान करावे. आज अनेक दलित तरूण प्रस्थापित माध्यमांच्या मागे न धावता स्वतःची माध्यमे तयार करून किंवा सोशल माध्यम मंचच्या अंतर्गत आपली प्रसिद्धी आणि आपल्या अन्याय अत्याचाराचा वाचा फोडण्याचा प्रयत्न केला जात आहे.

**संदर्भः**

➢ डॉ. बाबासाहेब आंबेडकर, (१९३६), आनिहीलेशन ऑफ कास्ट. शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

➢ डॉ. बाबासाहेब आंबेडकर,(१९५७),बुद्ध अँड हिज धम्मा, शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, पब्लिश १९९२, मुंबई.

➢ डॉ. बाबासाहेब आंबेडकर, १९७९–१९९०, डॉ. आंबेडकर ग्रायटिंगस अँड स्पीचस, खंड एक, दोन, तीन, चार, पाच, सहा, सात आणि आठ, शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.

➢ म फ गाजरे, १९८६, डॉ. आंबेडकर यांची भाषणे' खंड १. २, ३, ४, अशोक प्रकाशन, नागपूर.

➢ सी. सुरेश कुमार, १९९४, वायलेशन वरणीकुलंन ब्लॉग अँड इट्स युज मेडिया फोर दलितः क्रिटिकल डिस्कोर्स अनालिसेस, युरोपियन अमेरिकन रिसर्च पोंडीचेरी युनिव्हर्सिटी.

➢ गोपाळ गुरु, २०१२, राईज ऑफ द दलीत मिलेओनअर लोअ इंतेंसिटी स्पीतिकल, इकॉनोमिक अँड पॉलीटिकल विकली, न्यू दिल्ली, १५ डिसेंबर २०१२.

➢ बबन कांबळे, (२०१९), जातीचे कटू सत्य, संपादकीय लेख, दैनिक वृत्तरत्न सम्राट. मुंबई, दिनांक १३ फेब्रुवारी २०१९.

➢ डॉ. जी.एस. घुर्ये, १९६९, कास्ट अँड रेस इन इंडिया, प्युलर पब्लिकेशन मुंबई

➢ थोरात सुखदेव, १९८३ दलित निरंतर विषम आणि दारिद्रय सुगावा प्रकाशन पुणे.

➢ सुरवाडकर सुधाकर, २०१६, वास्तव अॅट्रॉसिटी कायद्याचे, अंतरंग, लोकसत्ता, दिनांक १७, सप्टेंबर २०१६.

➢ रमेश कांबळे, २००३ कॉन्टॅक्टस अलाईजींग आंबेडकर कन्वर्सेशन, ए पी डब्ल्यू ११ ऑक्टोबर २००३.

➢ तेलतुंबडे आनंद, २०११, इंडियाज (जाती) पंचायतराज इकॉनॉमिक अँड पॉलिटिकल विकली न्यू दिल्ली ३ सप्टेंबर २०११ व्हल्यु ३६ पेज

➢ सागर झेंडे २०११ प्रोसेस ऑफ ऍक्टिव्ह पॉलिटिकल पार्टिसिपेशन अँड एम्पवरमेंट ऑफ दलित वुमन पार्टिसिपेटिंग इन लोकल सेल्फ गव्हर्ननस इन महाराष्ट्र, मास्टर ऑफ इंटरनॅशनल डेव्हलपमेंट अँड मॅनेजमेंट लाऊडे युनिव्हर्सिटी.

➢ अशोक तांगडे, २००८, महाराष्ट्रातील दलित अत्याचाराचा सत्यशोधन समितीचे अहवाल २००६ ते २००८, मानवी हक्क अभियाना, मुंबई मराठी पत्रकार भवनात.

➢ त्रिभुवन के झेड,२०१८ एससी वर वाढलेले आत्याचार, विचारपीठ, दैनिक वश्त्तरत्न सम्राट मुंबई, २३ जानेवारी २०१८.

➢ Noam Chomsky and E. S. Herman (1988), 'Manufacturing Consent: The Political Economy of the Mass Media Pantheon Books Publishers New York.

➢ Jean Baudrillard, 1981,Simulacra and Simulation, Éditions Semiotext(e) Pblisher

➢ Glanda Daniels, 2010, 'The role of the media in a democracy: Unravelling the politics between the media, the state and the ANC in South Africa',the degree of Doctor of Philosophy in Political Studies University of the Witwatersrand, Johannesburg,

❑❑❑



Scanned by CamScanner